# महाराष्ट्र शासन
# भूमि अभिलेख विभाग
## उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई

सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०१४/प्र.क्र ४५/१२ मुंबई दिनांक ०३/०६/२०१४ नुसार व शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र प्रानिसं १२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ दिनांक ५/६/२०१४ नुसार जमाबंदी आयुक्त,पुणे व उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई यांचे अधिपत्याखालील विविध कार्यालयातील खालील रिक्त पदे भरण्याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून विहीत नमुन्यात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (M.K.C.L.) या संस्थे मार्फत अर्ज मागविण्यात येत आहेत.

### (१) पदाचे नाव व वेतनश्रेणी-लघुलेखक (निम्नश्रेणी), रु.९३००-३४८०० (ग्रेड पे ४३००)

| आरक्षण/ पदे | प्रकल्पग्रस्त | | भूकंपग्रस्त | | माजी सैनिक | | अंशकालीन | | खुली स्पर्धा | | खेळाडू | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला |
| अराखीव पदे -३ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ३ | ० |
| अनु. जमाती पदे - १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| *एकूण पदे - ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ३ | ० | ० | ० | ३ | १ |

### (२) पदाचे नांव व वेतनश्रेणी - भूकरमापक/लिपीक - टंकलेखक, रु. ५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)

| आरक्षण / पदे | प्रकल्पग्रस्त | | भूकंपग्रस्त | | माजी सैनिक | | अंशकालीन | | खुली स्पर्धा | | खेळाडू | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला |
| अराखीव पदे - ४+३ (अपंग) | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | २ | १ | ० | ० | ३ | १ |
| | श्रवणशक्तीतील दोष - २ , चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ | | | | | | | | | | | | | |
| अनु.जाती पदे - ८ | १ | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | २ | २ | १ | ० | ६ | २ |
| अनु.जमाती पदे - ६ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | २ | २ | ० | ० | ४ | २ |
| विमुक्त जाती -अ पदे - ५ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | ४ | १ |
| भटक्या जमाती-क पदे - २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| इ.मा.व. पदे - १२ | १ | ० | ० | ० | २ | ० | १ | ० | ४ | ३ | १ | ० | ९ | ३ |
| वि.मा.प्र. पदे - २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| शैसामाप्र (ईएसबीसी). पदे - २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| विमाप्र-अ (एसबीसी-ए) पदे- १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| *एकूण पदे ४२ + ३ (अपंग) =४५ | २ | ० | १ | ० | ६ | ० | ४ | ० | १५ | १२ | २ | ० | ३० | १२ |
| | श्रवणशक्तीतील दोष - २, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ | | | | | | | | | | | | | |

## (३) पदाचे नांव व वेतनश्रेणी - वाहनचालक, रु.५२००-२०२०० (ग्रेड पे १९००)

| आरक्षण/ पदे | प्रकल्पग्रस्त | | भूकंपग्रस्त | | माजी सैनिक | | अंशकालीन | | खुली स्पर्धा | | खेळाडू | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला | सर्व-साधारण | महिला |
| अराखीव पदे - ३ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ३ | ० |
| शैसामाप्र (ईएसबीसी) पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| ***एकूण पदे - ४** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **१** | **०** | **२** | **०** | **०** | **०** | **४** | **०** |

## (४) पदाचे नांव व वेतनश्रेणी - शिपाई, रु. ४४४०-७४४० (ग्रेड पे १३००)

| आरक्षण / पदे | प्रकल्पग्रस्त | | भूकंपग्रस्त | | माजी सैनिक | | खुली स्पर्धा | | खेळाडू | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला | सर्व साधारण | महिला |
| **जिल्हा - मुंबई उपनगर** | | | | | | | | | | | | |
| अराखीव पदे -११ | १ | ० | ० | ० | २ | ० | ४ | ३ | १ | ० | ८ | ३ |
| अनु.जाती पदे - ५ | ० | ० | ० | ० | १ | ० | २ | २ | ० | ० | ३ | २ |
| अनु.जमाती पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| भ.ज.क. पदे -२ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| इ.मा.व. पदे - ४ | ० | ० | १ | ० | १ | ० | १ | १ | ० | ० | ३ | १ |
| वि.मा.प्र. पदे -१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| शैसामाप्र (ईएसबीसी) पदे-२ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| विमाप्र-अ(एसबीसी-ए) पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| ***एकूण पदे - २७** | **१** | **०** | **१** | **०** | **४** | **०** | **१२** | **८** | **१** | **०** | **१९** | **८** |
| **जिल्हा- ठाणे** | | | | | | | | | | | | |
| अराखीव पदे -७ | १ | ० | ० | ० | १ | ० | २ | ३ | ० | ० | ४ | ३ |
| अनु.जाती पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| अनु.जमाती पदे -३ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | १ | ० | २ | १ |
| भटक्या जमाती -ब पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| भटक्या जमाती -क पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| शैसामाप्र (ईएसबीसी) पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| ***एकूण पदे - १४** | **१** | **०** | **०** | **०** | **२** | **०** | **६** | **४** | **१** | **०** | **१०** | **४** |
| **जिल्हा - रायगड** | | | | | | | | | | | | |
| अराखीव पदे -२ + १ (अपंग) | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | १ |
| | **चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ पद** | | | | | | | | | | | |
| अनु.जाती पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| ***एकूण पदे - ३ + १(अपंग) =४** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **१** | **१** | **०** | **०** | **२** | **१** |
| | **चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू - १ पद** | | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **जिल्हा- रत्नागिरी** | | | | | | | | | | | | |
| अराखीव पदे -१ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| अनु.जाती पदे- १ | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ० |
| अनु.जमाती पदे- २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| भटक्या जमाती -ब पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ |
| भटक्या जमाती -ड पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| इ.मा.व. पदे - १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | ० | ० | १ | ० |
| ***एकूण पदे - ७** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **४** | **२** | **०** | **०** | **५** | **२** |
| **जिल्हा - सिंधुदुर्ग** | | | | | | | | | | | | |
| अराखीव पदे -२ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | २ | ० |
| भटक्या जमाती -क पदे - २ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | १ |
| ***एकूण पदे - ४** | **०** | **०** | **०** | **०** | **१** | **०** | **२** | **१** | **०** | **०** | **३** | **१** |

* एकूण रिक्त पदांच्या संख्येत आणि आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे

## शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | लघुलेखक (निम्नश्रेणी)<br>रु.९३००—३४८०० (ग्रेड पे ४३००) | १. किमान माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण<br>२. मराठी टंकलेखनाची किमान ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखनाची ४० श.प्र.मि. शासन मान्य परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३. लघुलेखन क्षमता-इंग्रजी किंवा मराठी १०० शब्द प्रतिमिनिट पात्रता आवश्यक. |
| २ | भूकरमापक/ लिपीक -टंकलेखक<br>रु.५२००—२०२०० (ग्रेड पे १९००) | किमान शैक्षणिक पात्रता मान्यताप्राप्त अभियांत्रिकी महाविद्यालयातील किंवा मान्यताप्राप्त संस्थेतील स्थापत्य अभियांत्रिकी पदविका (Diploma in Civil Engineering) धारक असणे आवश्यक किंवा मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे दोन वर्षाचे सर्व्हेक्षक व्यवसायाचे प्रमाणपत्र धारक (I.T.I. Surveyor) असणे आवश्यक. |
| ३ | वाहन चालक<br>रु.५२००—२०२०० (ग्रेड पे १९००) | १) चौथी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) मोटार/जड वाहन चालविणेचा शासन मान्य परवाना.<br>३) मोटार चालविणेचा ३ वर्षाचा अनूभव असणे आवश्यक. |
| ४ | शिपाई -<br>रु.४४४०—७४४० (ग्रेड पे १३००) | किमान चौथी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक. |

**उपरोक्त अ.क्र. १ ते ४ पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षेसाठी (लेखी/मौखिक/व्यावसायिक) महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे [Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL) Pune] या संस्थे मार्फत (On line) अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण : ( MKCL Website - संकेत स्थळ) http://oasis.mkcl.org/landrecords2014 ही वेबसाईट दिनांक १०/११/२०१४ पासून कार्यरत होईल.**

ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची कार्यपध्दती व सर्वसाधारण अटी **महाराष्ट्र ज्ञान महामंडळ,पुणे [Maharashtra Knowledge Corporation Ltd. (MKCL) Pune] चे वेबसाईटवर दिलेले असुन सदर बाबतचे काळजीपुर्वक वाचन करून अर्ज करावे.**

अर्जाचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशील | कालावधी दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यत |
| १ | ऑनलाईन अर्ज करणेचा कालावधी | १०/११/२०१४ | १/१२/२०१४ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बँक ऑफ इंडियाचे (S.B.I.) शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | ११/११/२०१४ | ३/१२/२०१४ |
| ३ | ज्यांचे अर्ज दिनांक १/१२/२०१४ रोजी दाखल झाले आहेत. व ज्या उमेदवारानी बॅकेमध्ये दि. ३/१२/२०१४ पर्यत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी उरलेला ऑनलाईन अर्ज भरणेचा कालावधी | ५/१२/२०१४ | |

लघुलेखक, भूकरमापक/लिपीक टंकलेखक पदासाठी लेखी परिक्षा दिनांक २८/१२/२०१४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत घेणेत येईल . तसेच गट -ड शिपाई पदासाठीची लेखी परिक्षा त्याच दिवशी (दिनांक २८/१२ /२०१४) दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत घेणेत येईल .

**अर्ज दाखल करण्याची कार्यपध्दती**

- जाहिरात काळजीपूर्वक वाचावी .
- उमेदवार ऑनलाईन अर्ज ज्या पदासाठी भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी. पदासाठी विहीत अर्हता धारण करीत नसलेल्या उमेदवाराने अर्ज भरल्यास तो वैध होणार नाही.
- उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे आणि स्वत:चा अलीकडील काळातील पासपोर्ट साईज फोटो व सहीची Scanned image स्वत:जवळ असण्याची खात्री करावी. फॉर्म भरतेवेळी आपल्याला फोटो व सहीची image upload करावी लागेल .
- ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी Apply Online या लींकवर क्लीक करुन अर्ज भरण्यास सुरुवात करावी .
- आपणास अर्ज करावयाचे पद निवडा. एक एक करत आपणास विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर (Yes/No) पैकी योग्य पर्याय निवडा, संगणक प्रणाली तुम्ही दिलेल्या उत्तराच्या आधारे तुमची प्राथमिक पात्रता तपासेल.
- जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल तर ज्या विभागासाठी अर्ज भरावयाचा आहे तो विभाग निवडा आणि आवश्यक माहिती भरा.
- आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणाली तुमचा लॉग इन आय-डी, पासवर्ड आणि स्टेट बॅक ऑफ इंडीया चलन निर्माण करुन तुम्हाला तुमच्या स्क्रीनवर लॉग इन आयडी, पासवर्ड दाखवेल आणि तुम्ही पुरविलेल्या मोबाईल क्रमांकावर SMS करेल (कृपया आपण आपला मोबाईल क्रमांक अचूक टाकावा जेणेकरुन आपल्याला लॉग इन आयडी आणि पासवर्ड ची माहिती आपल्या मोबाईल क्रमांकावर SMS व्दारे प्राप्त होईल.) हा लॉग इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असेल .

- तुमच्या लॉग इन आयडी आणि पासवर्ड ची माहिती व चलन Print my login challan details या बटनवर क्लीक करुन प्रिंट काढावी .
- चलन प्राप्त केल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी आपल्या नजीकच्या भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेमध्ये जावे व चलनावर दर्शविलेले शुल्क बँकेत जमा करावे . बँक तुम्हाला शुल्क जमा केल्याची पोहोच देईल.
- कृपया शुल्क चलनावर दर्शविलेल्या अंतिम तारखेच्या आत भरा एकदा भरलेली फी कोणत्याही कारणास्तव परत केली जाणार नाही .
- भारतीय स्टेट बँकेत चलनाव्दारे शुल्क भरल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दुसऱ्या दिवशी उर्वरित ऑन लाईन अर्ज Fill Application Form/ अर्ज भरा. या लींकवर क्लीक करुन अर्ज पूर्ण भरावा. भारतीय स्टेट बँकेत चलनाव्दारे शुल्क भरल्यानंतर अर्जदाराने अर्जामध्ये खालील माहिती भरुन अर्ज पूर्ण करणे आवश्यक आहे. त्याशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही.

  १) वैयक्तिक माहिती
  २) आरक्षणाबददलची माहिती
  ३) शैक्षणिक माहिती
  ४) फोटो आणि सही अपलोड
  ५) कामाचा अनुभव
  ६) इतर आवश्यक माहिती

वरील सर्व माहिती अर्जामध्ये भरावी. ती भरलेशिवाय आपला अर्ज पूर्ण होणार नाही. माहिती भरल्यानंतर अर्जाची प्रत या विभागास (department) किंवा एम.के.सी.एल (M.K.C.L) ला पाठविण्याची आवश्यकता नाही .

तुमची अर्ज प्रक्रिया येथे पूर्ण होते. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईट चेक करावी. लेखी परीक्षेची ओळखपत्र परीक्षेपूर्वी तुमच्या लॉग इन मध्ये व वेबसाईट वर उपलब्ध राहिल. यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी . प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे .

निम्नश्रेणी लघुलेखक/गट -क ,भूकरमापक /लिपीक, वाहन चालक व शिपाई पदांसाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी रुपये ६००/-(अक्षरी रुपये सहाशे फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये ३००/- (अक्षरी रुपये तीनशे फक्त) परीक्षा शुल्क वरील सूचनानूसार भरावयाचे आहे.(सदर परीक्षा शुल्क हे कोणत्याही कारणस्तव परत केले जाणार नाही.) माजी सैनिक संवर्गातील उमेदवारांना शुल्काची अट लागू राहणार नाही.

**<u>सर्वसाधारण अटी :</u>**

१) उमेदवाराचे वय दिनांक १०/११/२०१४ रोजी किमान १८ वर्षे असावे. खुल्या संवर्गातील उमेदवारांचे वय ३३ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांचे वय ३८ वर्षांपेक्षा जास्त नसावे. त्याच बरोबर अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

तसेच प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त /स्वातंत्र्य सैनिकांनी नामनिर्देशित केलेले उमेदवार/निवडणूक कर्मचारी/अपंग प्रवर्गातील उमेदवारांसाठी दिनांक १०/११/२०१४ रोजी ४५ वर्षे व अंशकालीन उमेदवारांसाठी ४६ वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील.

माजी सैनिक उमेदवारांसाठी दिनांक १०/११/२०१४ रोजी ४५ वर्षे ही कमाल वयोमर्यादा राहील (दि.१०/११/२०१४ रोजीच्या वयातून त्यांची सैनिकी सलग सेवा + ३ वर्षे वजा केल्यानंतर)

शासन सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी भूकरमापक व तत्सम पदांसाठी वयाची मर्यादा १० वर्ष शिथीलक्षम राहील.

२) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. उमेदवाराने सक्षम अधिका-यांचे रहिवास/डोमिसाईल प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळी सादर केले पाहिजे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक आस्था-२०१०/१५६०/प्र.क्र.४३२/ई-६,दिनांक ०९/०९/२०११ नुसार अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास उमेदवाराने त्याचा जन्म महाराष्ट्रात झाला असल्याचा जन्माचा दाखला (**Birth Certificate**)/ शाळा सोडल्याचा दाखला मुलाखतीच्या वेळी सादर केले पाहिजे .

३) अ.क्र १(लघुलेखक-निम्न श्रेणी) हे पद राज्यस्तरीय आहे क्रमांक २(भूकरमापक/लिपिक-टंकलेखक) व ३ (वाहन चालक) ही पदे विभागस्तरीय व पद क्रमांक ४(शिपाई) हे पद जिल्हास्तरीय असून त्या संवर्गातील घटनादत्त व समांतर आरक्षण विचारात घेवून गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

४) अंशकालीन पदवीधर बेरोजगार, जनगणना कर्मचारी, संपकालीन कर्मचारी व यापूर्वी शासकीय सेवेत आलेल्या कर्मचा-यांचे अनुभवाच्या बाबतीत तासिका तत्वावर शिकावू उमेदवाराने अर्धवेळ, विनावेतन, अतिरिक्त कार्यभार, प्रभारी पदावरील अनुभव ग्राहय धरला जाणार नाही.

५) सामाजिक व समांतर आरक्षण लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी तसे अर्जामध्ये स्पष्ट नमूद करणे आवश्यक आहे .

६) वि.जा.(अ),भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड),इमाव व वि.मा.प्र.या प्रवर्गातील तसेच मुस्लीम व मराठा आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील निर्णय दिनांक १५/७/२०१४ व शासन अल्पसंख्याक विकास विभागाकडील निर्णय दिनांक १९/७/२०१४ नुसार सक्षम अधिकाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र तसेच नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र) सन २०१३-२०१४ चे कागदपत्र तपासणीवेळी/ मुलाखतीवेळी सादर करणे आवश्यक आहे

७) अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण हे शासन निर्णय,शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक रक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक ३० एप्रिल २००५ , दि.१७/०८/२०१० , शासन निर्णय क्रमांक:क्री स्पर्धा-२१०८/(प्र.क्र ४४०/०८)/क्रीयुसे-२, दिनांक २० सप्टेंबर २०१३ व शासन निर्णय क्रमांक:राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ३० डिसेंबर २०१३ मधील तरतुदीनुसार राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्य स्तरावरील /अखिल भारतीय आंतर विदयापीठ स्तरावरील प्रमाणपत्र (शासन निर्णय परिशिष्ट-अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिका-याचे असावे. प्रमाणपत्राचे पात्रतेबाबत क्रिडा संचालनालयाचा निर्णय अंतिम राहील. असे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याखेरीज नियुक्ती दिली जाणार नाही .

८) गट-क,भूकरमापक/लिपीक-टंकलेखक संवर्गासाठी श्रवणशक्तीतील दोष, आणि एका पायाने चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू असलेला उमेदवार पात्र आहे. गट- ड शिपाई पदासाठी एका पायाने विकलांगता, श्रवणशक्तीतील दोष, क्षीणदृष्टी/अंध उमेदवार पात्र राहतील. अपंग प्रवर्गातील उमदेवारांसाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० % असणे आवश्यक राहील.तसे सक्षम प्राधिकृत वैद्यकीय मंडळाने प्रमाणित केलेले वैद्यकीय प्रमाणपत्र साक्षांकित करुन मुलाखतीसमयी/कागदपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे .तसेच लेखनिकाची मदत आवश्यक असेल तर **अर्जातच तसा उल्लेख करुन** लेखनिकाची परीक्षेची नापरतावा फी रक्कम रुपये १००/- लेखी परीक्षेपुर्वी रोख स्वरुपात पर्यवेक्षकांकडे जमा करणे आवश्यक राहील.

९) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन परिपत्रक क्र.अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ०६/०५/२००४ अन्वये अपंगाच्या तीनही प्रवर्गातील आरक्षण हे आंतरबदलीय असलेने अपंगाचे इतर संवर्गातील उमेदवार अर्ज करु शकतील मात्र संबंधीत प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांचा विचार केला जाईल

१०) महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बाल कल्याण विभाग क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२,दिनांक २५ मे २००१ मधील तरतुदीनुसार राहील. तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणा-या खुल्या प्रवर्गातील स्त्री उमेदवारांनी देखील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (सन २०१३-२०१४ मधील नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र मुलाखतीचेवेळी / कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक राहील.

११) सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२,मंत्रालय,मुंबई दिनांक १ जुलै २००५ नुसार लहान कुटूंब असल्याबाबतचे सोबतच्या नमुन्यातील प्रतिज्ञापत्र मुलाखतीचेवेळी / कागदपत्रे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे (अविवाहीत उमेदवारांनी सुध्दा **' लागू नाही '** असा शेरा नमूद करुन मुलाखतीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.)

१२) वाहन चालक संवर्गातील पदांसाठी व्यावसायिक चाचणी ६० गुण , व शारिरीक क्षमतेची चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल. सदर चाचणी संबधित विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी घेण्यात येईल .

१३) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदासाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास वैधता प्रमाणपत्र मुलाखतीसमयी /कागदपत्राचे पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे

१४) निम्नश्रेणी लघुलेखक हे पद राज्यस्तरीय असल्याने उपलब्ध पदांचा विचार करुन राज्यात उपलब्ध असलेल्या पदावर नियुक्ती देणेत येईल. गट-क,भूकरमापक/लिपीक-टंकलेखक संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी ज्या विभागासाठी अर्ज सादर केला आहे **त्याच विभागात** त्यांचा नियुक्तीसाठी विचार केला जाईल व त्यांच्या सेवा त्या विभागामध्ये बदलीपात्र असतील. शिपाई संवर्गासाठी अर्ज करणा-या उमेदवारांनी ज्या जिल्हयासाठी अर्ज केला आहे **त्याच जिल्हयात** त्यांचा नियुक्तीसाठी विचार केला जाईल व त्यांच्या सेवा जिल्हाअंतर्गत बदलीपात्र असतील.

१५) अंतिमरित्या निवड केलेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्र.अनियो-१००५/१२६/सेवा-४,दिनांक ३१/१०/२००५ नुसार नविन परिभाषिक अंशदान निवृत्ती योजना लागू होईल. सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

१६) भूकरमापक/लिपीक-टंकलेखक पदासाठी निवडलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९,दिनांक १९/०३/२००३ नुसार संगणक अर्हता (MS-CIT) नियुक्तीचे दिनांकापासून २ वर्षाचे आत धारण करणे आवश्यक राहील.

१७) तसेच भूकरमापक/लिपीक-टंकलेखक पदासाठी मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. गतीची अर्हता पूर्ण करीत नसलेली व्यक्ती ही सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र ठरेल तथापि नियुक्तीनंतर दोन वर्षात सदर अर्हता प्राप्त करणे आवश्यक राहील.

लघुलेखक (निम्नश्रेणी) हे पद राज्यस्तरीय असले तरी अर्ज ज्या विभागात केला आहे त्या विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी,भूकरमापक/लिपीक-टंकलेखक पदासाठी ज्या विभागासाठी अर्ज सादर केलेला त्या विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी लेखी परीक्षा घेण्यात येईल. तसेच गट-ड शिपाई पदासाठी ज्या जिल्हयासाठी अर्ज सादर केलेला आहे तो जिल्हा ज्या विभागामध्ये समाविष्ट आहे त्या विभागाचे मुख्यालयाचे ठिकाणी लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.

१८) लघुलेखक (निम्नश्रेणी) ,गट क भूकरमापक /लिपीक या पदांसाठी लेखी परिक्षा दिनांक २८/१२/२०१४ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत घेणेत येईल.
तसेच गट ड, शिपाई या पदासाठी लेखी परिक्षा त्याच दिवशी (दि.२८/१२/२०१४ रोजी ) दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत घेणेत येईल.

१९) लेखी परिक्षा व मौखिक परिक्षा केवळ मराठी माध्यमातून घेतली जाईल.

२०)अ) निम्नश्रेणी लघुलेखक पदासाठी लेखी परीक्षा व व्यावसायिक चाचणी घेणे आवश्यक असेल अशा पदांसाठी १२० गुणांची लेखी परीक्षा व ८० गुणांची व्यावसायिक चाचणी असे गुण ठेवून उमेदवारांची निवड करुन गुणवत्तापात्र उमेदवारांच्या शिफारशी करण्यात येईल .

ब) भूकरमापक / लिपीक-टंकलेखक पदासाठी २०० गुणांची लेखी परीक्षा वस्तुनिष्ठ स्वरुपाची (**Objective type**) असेल. लेखी परीक्षेला मराठी,इंग्रजी,सामान्यज्ञान, व बौध्दिक चाचणी या विषयाकरीता प्रत्येकी ५० गुण असून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल

क) वाहन चालक संवर्गातील पदांसाठी शासन निर्णय कमांक प्रानिम १२१४/प्र.क (४३/१४)/१३-अ, मुंबई दिनांक ०५/०६/२०१४ नुसार व्यावसायिक चाचणी ६० गुण , व शारिरीक क्षमतेची चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल.

ड) गट-ड शिपाई पदासाठी ७५ गुणांची लेखी परीक्षा असेल. लेखी परीक्षा ही पदासाठी आवश्यक असलेली किमान अर्हता, सामान्य ज्ञान, बुध्दीमत्ता चाचणी व पदासाठी आवश्यक असलेल्या ज्ञानावर आधारीत राहील. २५ गुणांची मौखिक (मुलाखत) परीक्षा घेवून गुणवत्तेनुसार उमेदवारांची निवड केली जाईल.

२१) अ) निम्नश्रेणी लघुलेखक /गट-ड शिपाई पदांसाठी लेखी परीक्षा व व्यावसायिक परीक्षा /मुलाखतीद्वारे प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन त्या आधारे पदासाठी गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय निवड यादी जाहीर केली जाईल.

ब) भूकरमापक / लिपीक-टंकलेखक पदासाठी लेखी परीक्षेच्या आधारे प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे पदासाठी गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय निवड यादी जाहीर केली जाईल.

क) वाहन चालक पदांसाठी व्यावसायिक परीक्षा आणि शारिरीक क्षमतेची चाचणी यामध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन त्या आधारे पदासाठी गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय निवड यादी जाहीर केली जाईल.

उपरोक्त सर्व पदांसाठी निवड यादी तयार करताना समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग / प्रवर्गाच्या उमेदवारांची निवड ही शासन सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय दिनांक २७/६/२००८ मधील तरतूदीप्रमाणे केली जाईल.

तसेच महाराष्ट्र शासन अधिसुचना दि.०९/०६/२०१४ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करणेत येईल.

२२) परीक्षेची पध्दत, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमि अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे हे स्वतःकडे राखून ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२३) निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व फौजदारी गुन्हा नोंदविला जाईल.

२४) उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

**सदस्य सचिव, गट क निवड समिती.**
**तथा जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख संलग्न**
**उपसंचालक भूमि अभिलेख, कोंकण प्रदेश, मुंबई**